ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भारतीय राज्य घटना व महिला हक्क

**मोहन सखाराम कांबळे, Ph. D.**

*आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालये, पुणे ३०*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

**प्रास्ताविक-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या घटना समितीने जगातील बदलत्या वातावरणाची नोंद घेऊन व भारतातील समता चळवळीचे नेते म्हणून महिलांना समान हक्क दिले. आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीने जाणिवपुर्वक स्त्रीयांना स्वातंत्र्य लढयाच्या मुख्य प्रवाहात सामिल करून घेतले औडयोगिकदृष्टया महाराष्ट्र हे देशातील सर्वात पुढारलेले तसेच पुरोगामी राज्य स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तीनही घोषणा आधुनिक युगाच्या प्रेरक शक्ती आहेत. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, महर्षी धोंडो केशव कर्वे इ. समाज सुधारकांनी समाज जागृतीसाठी अखंड परिश्रम घेतले. त्यापासून स्फूर्ति घेवून पंडिता रमाबाई, डा. आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे अशा कितीतरी ज्ञात अज्ञात स्त्रीयांनी स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीप्रश्नांची मांडणी करण्यात मोठया धाडसाने सुरवात केली.

स्त्रीयांसाठी अनेक नवीन योजना सुरू केल्या आहेत. मात्र प्रत्यक्षात या योजना माहिती अभावी योग्य लोकांपर्यंत पोहचत नाही. स्व. राजीव गांधीच्या काळात झालेल्या ७३ व्या घटना दुरूस्तीनंतर महाराष्ट्रात एक लाखाच्यावर स्त्रीया ग्रामपंचायती आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामध्ये निवडून येत आहेत. त्याच बरोबर स्त्रीयांच्या बचत गटांच्या माध्यमातून एक नवी आर्थिक आणि सामाजिक शक्ति उदयाला येत आहे. स्त्रीयांचे हक्क आणि नव्या योजना यांची जाणिन झाल्यास देशाचा कायापालट करण्याची ताकद या शक्तिमध्ये निश्चितच आहे.

**पार्श्वभूमी** - स्वातंत्र्यानंतर प्रजासत्ताक भारताच्या राज्यघटनेने स्त्रीयांचा समानतेचा मूलभूत हक्क मान्य केला स्त्रीया तसेच अन्य दुर्बल घटकांची संरक्षण करण्यासाठी खास सवलती आणि कायदे करण्याची तरतूद घटनेत केली गेली. जीवनाच्या सर्व अंगात स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करण्यात कायडयांचे महत्त्व आहे. विषमता, दारिद्रय, पुरूष प्रधानता व पितृसत्ताकता, जातिभेद, वर्णभेद, वंशभेद, धार्मिक तणाव यामुळे घटनेने दिलेली समानता प्रत्यक्षात येत नाही. यासाठी स्त्री विषयक कायदयात कालमानाप्रमाणे बदल आवश्यक आहे. मात्र केवळ कायदे करून भागत नाही. कायदयाची अंमलबजावणी व्हावी यासाठी कायदे

पुस्तकात किंवा न्यायालयापुरतेच मर्यादित राहता कामा नये. सर्वसामान्य स्त्रीयांनाही त्यांच्या कायदेशीर हक्काची जाणिव व्हावी हे अधिकार व्यापक आहेत व ते सहा भागात आहेत.

१. समानतेचा

२.स्वातंत्र्याचा अधिकार

३.शोषणाला विरोध करण्याचा अधिकार

४.धार्मिक स्वातंत्र्या अधिकार

५.शिक्षण व संस्कृतीचा अधिकार

६ घटनेच्या सवैधानिक संरक्षणाचा अधिकार

**घटनेच्या मूलभूत हक्कामध्ये समानतेचा अधिकार हा स्त्रीयांसाठी सर्वात महत्त्वाचा आहे.**

वारसा कायदा- घटनेने स्त्रीयांना समान मानले असले तरी प्रत्यक्षात स्त्रीला समान हिस्सा मिळतो असे दिसत नाही महाराष्ट्रराज्यात १९९४ साली हिंदू वारसा कायदयात एक महत्त्वाची दुरूस्ती केली गेली.अशी दुरूस्ती करणारे महाराष्ट्रराज्य हे देशातील एकमेव राज्य आहे. त्यानुसार २२ जून १९९४ नंतर मुलीला मुलाप्रमाणेच जन्मतःच मालमत्ता विषयक अधिकार मिळाललेले आहेत.मात्र २२ जून १९९४ पूर्वी झालेल्या वाटणीस या कायदयातील तरतूदी लागू नाहीत.

राहत्या घराची मालकी – स्त्रीचे लग्न झाल्यावर ती पतीच्या घरी जाते पण त्या घरावर तिचा काहीच हक्क राहत नाही सर्वसाधारणतः पतिपत्नीचा तंटा झाला की पत्नीला घरातून बाहेर जा असे सांगितले जाते ही परिस्थिती बदलण्यासाठी आता नवा नियम करण्यात आला आहे. त्यानुसार सहकारी गृहनिर्माण संस्था, जमिनीचा पटटा, भूखंड हे आता पतिपत्नी या दोघांच्या सामाईक मालकीचे होईल. यासाठी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग मदतीसाठी उपलब्ध आहे.

अत्याचार – भय हा विकासाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे. असे शासनाचे ठाम मत आहे. प्रत्येक महिलेला शारीरिक आणि मानसिक हिंसाचाराच्या भितीपासून मुक्त असे जीवन जगता आले तरच ख-या अर्थाने विकासाला आवश्यक असा आत्मिक फुलोरो निर्माण होऊ शकतो. समाजाचे झपाटयाने होणारे गुन्हेगारीकरण चित्रपटतून सातत्याने केले जाणारे अत्याचाराचे चित्रीकरण यामुळे अत्याचाराला एक प्रकारे उत्तेजनच मिळते.स्त्रीयांवरील अत्याचार हर केवल वैयक्तिक स्वरूपाचे नसून सामाजिक आहेत. स्त्रीचे समाजातोल स्थान समाजातील स्त्री-परूषांसाठी दुहेरी नीतीमूल्ये या सर्वांमुळे पदोपदी कुचंबना होते. पण या समस्याला ती जबाबदार नसून भोवतालची परिस्थिती जबाबदार असते. स्त्रीयांना अत्याचाराविरूध्द विविध कायदयांचा आधार घेता येतो.स्त्रीयांच्या वैयक्तिक समस्या ह्या खूप गुंतागुंतीच्या असल्यातरोही त्याचे खालीलप्रमाणे वर्गिकरण करता येईल.

- छेडछाड
- शारीरिक जबरदस्ती

- अपहरण
- बलात्कार
- पैसासाठी छळ खून आत्महात्या
- मारहाण
- व्यसनाधिन नव-याकडून मारहाण
- मनसिक छळ
- कुर वागणूक भ्रूण हत्या
- अंधश्रध्दा जाचक रुढींमुळे छळ
- कामाच्या ठिकाणी होणारा छळ
- मुली देवाला सोडणे
- बालिकावरील अत्याचार
- अनेक लग्ने व बाहेर ख्यालीपणा
- जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणे
- युध्द व दंगलीमध्ये होणारा स्त्रीयांवरील अत्याचार
- स्त्रीयांचा आंतरराष्ट्रीय व्यापार
- पतिने दुसरा विवाह करुन सोडून देणे

अन्याय पिडीत महीला छळाबददल तक्रारक कोणाकोणाकडे करू शकतो. ते पुढिलप्रमाणे

- पोलिस स्थानक
- स्त्री संघटना
- महिला आयोग
- न्यायालय
- महिला तक्रार निवारण समिती

वरील प्रकारे स्त्री सक्षमीकरणासाठी अधिकार व कायदे असले तरी प्रत्यक्ष कुटुंबातील नाती जपणे व कुटुंबामध्ये महिलांचा योग्य तो सन्मान ठेवणे आवश्यक आहे. आज सर्वच क्षेत्रात स्त्रीया या पुरूषाच्या तुलनेत कोठेच कमी नाहीत अनेक स्त्रीयांना आपल्या हक्कापासून आणि अधिकारापासून वंचित रहावे लागते आहे .कायदयाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली तर स्त्रीया सबलीकरणाच्या दिशेने चांगली वाटचाल करू शकतील भारतामध्ये आरोग्य शिक्षण रोजगार व आर्थिक सबलीकरणाच्या क्षेत्रात अपेक्षित यश मिळत नाही तरी देखील आज स्त्रीया सर्वच क्षेत्रात प्रगती करताना दिसत आहेत.

## संदर्भ

*उदधव कांबळे, मानवी हक्क तत्व आणि दिशाभूल , साकेत प्रकाशन*
*गारोडे प्रमोध, २००१, भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क व कर्तव्ये*
*Navjyot/Vol.I/ Issue-I 2012*
*मानव अधिकार संरक्षण अधिनियम,१९९३, ( मानव अधिकार संरक्षण अधिनियम,२००६) न्यू दिल्ली.*
*महिलांचे हक्क व अधिकार , महिला व बाल विकास विभान, महाराष्ट्र शासन*
*राजवाला सिंह, मानवाधिकार आणि महिला*